# दिवा न्यूज

दिशादर्शक, मार्गदर्शक!

www.diwanews.com



आता डिजिटल स्वरूपात...

दिवा न्यूजची वेबसाईट सुरू..!

ताज्या घडामोडी आणि बातम्यांसाठी लॉग इन करा

www.diwanews.com

आता कुठेही असा...दिवा न्यूज वाचा एका क्लिक वर..

epaper.diwanews.com



▶ वर्ष–२ ■ अंक–२० ■ epaper.diwanews.com ■ सोमवार, १९ डिसेंबर २०२२ ■ पाने–८ ■ किंमत ४ रु. RNI No.-MAHMAR/2021/80669


## २५ डिसेंबर पासून दिवा महोत्सवाला सुरवात

दिवा:– दिव्यातील बहुप्रतिक्षित दिवा महोत्सव येत्या २५ डिसेंबर पासून ३० डिसेंबर पर्यंत दिवा येथील प्रेरणा टॉवर मैदानात आयोजित करण्यात आला आहे. धर्मवीर मित्र मंडळ व बाळासाहेबांची शिवसेना यांच्या वतीने या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून किंवा शहरातील नागरिकांसाठी या महोत्सवात कार्यक्रमाची रेचर असणार आहे.

### राज्यातला पहिला अत्याधुनिक घनकचरा प्रकल्प दृष्टीपथात

# १४८ कोटींच्या प्रकल्पाला राज्य शासनाची मंजुरी

### हा प्रकल्प राज्यासाठी पायलट प्रकल्प ठरणार

### खासदार डॉ. श्रीकांत शिंदे

**ठाणे:** अंबरनाथ, बदलापूर आणि उल्हासनगर या शहरातील आणि घनकचऱ्याची समस्या सोडवण्यासाठी महत्वाकांक्षी ठरणाऱ्या संयुक्त घनकचरा प्रकल्पाला राज्य शासनाने मंजुरी दिली आहे. अंबरनाथ, बदलापूर आणि उल्हासनगर या तीन शहरांचा संयुक्त घनकचरा प्रकल्प दृष्टीक्षेपात आला असून १४८ कोटी ६८ लाख रूपये खर्चून ६०० मेट्रीक टन क्षमतेचा हा प्रकल्प बदलापूर पालिकेच्या कचराभूमीवर सुरू केला जाणार आहे. कल्याण लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी ठाण्यात आयोजित पत्रकार परिषदेत याविषयी माहिती दिली. हा प्रकल्प राज्यासाठी आदर्श आणि पायलट प्रकल्प ठरेल अशी आशाही त्यांनी व्यक्त केली.

घनकचरा व्यवस्थापन हे नवे आव्हान सध्या शहरांपुढे उभे ठाकले आहे. मात्र त्यावर शास्त्रशुद्ध आणि आधुनिक पद्धतीने तोडगा काढला जावा या हेतून खासदार डॉ. शिंदे यांनी आपल्या मतदारसंघातील कचराप्रश्नी तोडगा काढण्यासाठी अभ्यास सुरू केला होता. कल्याण लोकसभा मतदारसंघातील अंबरनाथ शहरात घनकचरा व्यवस्थापनाचा प्रश्न गंभीर झाला होता. त्यासाठी परदेशातील तंत्रज्ञान जाणून घेण्यासाठी स्वतः खासदार, स्थानिक नगरपालिका




### अंबरनाथ, बदलापूर आणि उल्हासनगरचा संयुक्त प्रकल्प

आणि लोकप्रतिनिधी यांच्यासमवेत परदेशी गेले होते. त्यानंतर त्यांनी हा प्रकल्प राबवण्यासाठी हालचाली सुरू केला. या प्रकल्पासाठी अधिकचा कचरा आवश्यक होता. यासाठीचा खर्च अधिक असल्याने संयुक्त पद्धतीने हा प्रकल्प राबवल्यास त्याचा फायदा इतरही पालिकांना होईल, हा विचार करून खासदार डॉ. शिंदे यांनी कुळगाव बदलापूर नगरपालिकेला यात सहभागी करून घेतले. त्यासाठी बदलापूर नगरपालिकेची कचराभूमी वापरण्याचा निर्णय झाला. त्यानुसार एमएमआरडीए प्रशासनाने यासाठी १४८ कोटींचा निधी मंजूर केला होता. पुढे कल्याण लोकसभा मतदारसंघात असलेल्या उल्हासनगर महापालिका प्रशासनानेही या प्रकल्पात सहभागी होण्याची इच्छा व्यक्त केली होती. त्यानुसार उल्हासनगर शहरालाही घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पात

### ... असा असेल प्रकल्प

***तीनही शहरांमधल्या सर्व प्रकारच्या कचऱ्याचे वर्गीकरण केले जाणार आहे. यातील अंदाज ४५ टक्के कचरा ओला असून ५५ टक्के कचरा सुका प्रकारातील आहे. यातील ४५ टक्के ओल्या कचऱ्याचे कम्पोस्ट खतामध्ये रूपांतर केले जाणार आहे. पुढे कंपनी हे खत विक्रीसाठी ठेवेल. उर्वरित ५५ टक्के कचऱ्यापैकी २२ टक्के राडारोडा, डेब्रीज आहे. त्याचा वापर उपलब्ध जागेत असलेल्या खाणीत भूभराव करण्यासाठी वापरला जाईल. तर १३ टक्के एमआरएफ प्रकारातील प्लास्टीक, काचा आणि कापड यासारख्या कचऱ्यावर प्रक्रिया केली जाईल. उरलेल्या २० टक्के आरडीएफ प्रकारातील कचऱ्याचे कांदा कोळसा या जास्त उष्मांक असलेल्या कोळशात रूपांतर केले जाणार आहे. त्या कोळशाची विक्री कंपन्यांना केली जाऊ शकते.***

सहभागी करण्याचा निर्णय झाला. आता राज्य शासनाच्या नगरविकास विभागाने या प्रकल्पाला मंजुरी दिली आहे. शुक्रवारी खासदार शिंदे यांनी पत्रकार परिषदेत याबाबतची माहिती जाहीर केली. बदलापुरच्या वालिवली येथील सर्वे क्रमांक १८८ येथील २३ एकर जागेपैकी १३ एकर जागेत हा प्रकल्प उभा राहणार आहे. हा प्रकल्प अत्याधुनिक तंत्रज्ञान वापरून उभारला जाणार आहे. हा प्रकल्प बंदिस्त असणार आहे. येथे कोणत्याही प्रकारचा कचरा टाकला जाणार नाही. संकलित केलेला कचरा थेट प्रक्रिया यंत्रांमध्ये टाकला जाईल. त्यामुळे त्याचा कुणालाही त्रास होणार नाही, अशी माहिती यावेळी खासदारांनी दिली. हा प्रकल्प राज्यासाठी आदर्श आणि पायलट प्रकल्प ठरेल अशीही आशा त्यांनी यावेळी व्यक्त केली. येत्या महिनाभरात याची निविदा प्रक्रिया राबवली जाईल. वर्षभराच्या आत हा प्रकल्प कार्यान्वित केला जाईल, असेही ते यावेळी म्हणाले. यावेळी अंबरनाथ नगरपरिषदेचे मुख्याधिकारी डॉ. प्रशांत रसाळ, उल्हानगर महानगरपालिका आयुक्त अजीज शेख, बदलापूर नगरपरिषद मुख्याधिकारी योगेश गोडसे,कल्याण लोकसभा जिल्हाप्रमुख गोपाळ लांडगे, शिवसेना प्रवक्ते व ठाणे जिल्हा प्रमुख नरेश म्हस्के, ठाणे परिवहन सभापती विलास जोशी, बदलापूर शहरप्रमुख वामन म्हात्रे, अंबरनाथ माजी नगराध्यक्ष मनीषा वाळेकर, सुनील चौधरी व उपनगराध्यक्ष अब्दुल शेख, उल्हासनगर माजी नगरसेवक अरुण आशान, कलवंत सहोता, नाना बागुल आदी उपस्थित होते.

# ‘बंद’मुळे ठाणे महापालिका परिवहनला १५ लाखांचा फटका



**ठाणे :** वारकऱ्यांनी पुकारलेल्या बंदामध्ये ठाणे परिवहन सेवेची एकही बस रस्त्यावर न उतरल्याने ठाणेकर नागरिकांच्या हालसोबत परिवहन सेवेला १५ लाखांचा फटका बसला आहे. मात्र आम्ही काय करणार आदेश आल्याने आम्ही त्याचे पालन केल्याचे परिवहनच्या एका वरीष्ठ अधिकाऱ्याने बोलताना सांगितले.

हिंदुत्ववादी संघटनांनी पुकारलेल्या बंदमध्ये परिवहन सेवेने देखील आपली सेवा बंद ठेवल्याचे दिसून आले. परिवहनच्या ३२४ बसपैकी एकही बस शनिवारी रस्त्यावर धावू शकली नाही. त्यामुळे सकाळच्या सत्रत लोकलने ठाणे गाठून त्यातच रिक्षा देखील बंद करण्यात आल्याने प्रवाशांना पायी जाण्याशिवाय पर्याय राहिला नसल्याचे दिसून आले. एकीकडे एसटी, बेस्ट, नवीमुंबई महापालिका व इतर प्राधिकरणाच्या बस ठाण्यात येत होत्या. परंतु ठाण्याचीच परिवहन सेवा बंद करण्यात आल्याने प्रवाशांनी नाराजी व्यक्त केल्याचे दिसून आले. परिवहन सेवा ही सार्वजनिक वाहतुक सेवा असल्याने ती चालू ठेवणे गरजेचे होते. परंतु तरी देखील ती कोणाच्या सांगण्यावरुन बंद ठेवण्यात आली असा सवाल प्रवाशांनी केला.

दिशादर्शक, मार्गदर्शक!
# दिवा न्यूज

ताज्या घडामोडी वाचण्यासाठी लॉग इन करा
www.diwanews.com

सोमवार, १९ डिसेंबर २०२२


## इशान खांडेकरच्या नाबाद शतकामुळे

## सुलोचना सिंघानिया विजयी



**ठाणे :** सलामीचा फलंदाज इशान खांडेकरच्या नाबाद शतकी खेळीच्या जोरावर ठाण्याच्या सुलोचना सिंघानिया स्कुलने अंजुमन इस्लाम स्कुलचा दहा विकेट्सनी दणदणीत पराभव करत मुंबई शालेय क्रिडा संघटना आयोजित १४ वर्ष वयोगटाच्या गाईल्स शिल्ड क्रिकेट स्पर्धेच्या तिसऱ्या फेरीत स्थान मिळवले.

सामन्यात प्रथम फलंदाजी करताना अंजुमन इस्लाम स्कुलने २०५ धावांचे आव्हान प्रतिस्पर्धी संघसमोर उभे केले. त्यांच्या आरव शर्माने अर्धशतक पूर्ण करत ६७ धावांचे योगदान दिले. देवांश शिंदेने तीन, विहान जाजुने दोन, शिवम चव्हाण, अरीन चुबल, अद्वैत कचराज आणि अनिश नायरने प्रत्येकी एक विकेट मिळवली. उत्तरादाखल इशानने नाबाद ११८ धावांची तडाखेबंद खेळी करत संघाला एकहाती विजय मिळवून दिला. त्याचा सलामीचा जोडीदार अद्वैत कचराज २५ धावांवर नाबाद राहिला.

## १९ डिसेंबर २०२२ पासून विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन

**ठाणे :** कोविडमुळे नागपूर येथे दोन वर्षांच्या खंडानंतर विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन १९ डिसेंबरपासून सुरुवात होत आहे. या अधिवेशनासाठी येणारे लोकप्रतिनिधी, अधिकारी, प्रसारमाध्यमांचे प्रतिनिधी आदी सर्वांच्या निवासव्यवस्थेचे संबंधित सर्व विभागांनी काटेकोर आणि अचूकपणे नियोजन करावे. कोणाचीही कुठलीही गैरसोय होणार नाही याची दक्षता घ्यावी. हिवाळी अधिवेशनाच्या काळात केलेल्या सर्व व्यवस्थेची माहिती एका क्लिकवर उपलब्ध होण्याच्यादृष्टीने मोबाईल ॲप तयार करावे, असे निर्देश सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून), अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री रविंद्र चव्हाण यांनी दिले. नागपूर येथील हिवाळी अधिवेशन २०२२ च्या प्रस्तावित निवास व्यवस्था, स्वच्छता व्यवस्था, आहार व्यवस्था, वाय-फाय व्यवस्था, प्रसारमाध्यमांची व्यवस्था आदींचा सविस्तर आढावा मंत्री चव्हाण यांनी घेतला. यावेळी सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव सुजाता सौनिक, सामान्य प्रशासन विभागाचे सहसचिव सो. ना. बागूल मृद व जलसंधारण विभागाचे सहसचिव सुभाष गावडे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता दिनेश नंदनवार, कार्यकारी अभियंता अभिजित कुचेवार यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. नागपूरच्या विभागीय आयुक्त विजयालक्ष्मी बिद्री आणि जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर नागपूर येथून दूरदृश्य प्रणालीद्वारे सहभागी झाले होते.

## रांची येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धे साठी ठाण्याच्या अपूर्वाची निवड



**ठाणे:** कोल्हापूर क्रीडा ज्यूदो असोसिएशन आयोजित ४९ वी ज्युनिअर राज्यस्तरीय स्पर्धेत ठाण्यातील दोन खेळाडूंनी सुवर्णपदकांसह रौप्यपदक जिंकले. यातील अपूर्वा महेश पाटील हिची निवड रांची येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी झालेली आहे. कोल्हापूर शिवाजी युनिव्हर्सिटी येथे ९ ते ११ डिसेंबर २०२२ दरम्यान पार पडलेल्या ४९ ज्युनिअर राज्यस्तरीय स्पर्धेत सरस्वती क्रीडा संकुलाची अपूर्वा पाटील हिने ७८ किलो या वजनी गटात सुवर्णपदक जिंकले. तर प्रेरणा अजय रिसबूड हिला ५७ किलो या वजनी गटात रौप्य पदकावर समाधान मानावे लागले आहे. यादोघींसहश्रद्धा गिरी हीनेही या स्पर्धेत सहभाग घेतला होता. या तिघी प्रशिक्षक देवीसिंग राजपूत यांच्या मार्गदर्शनाखाली ज्यूदोचा सराव करतात.

**संपादक**
सुहास खंडागळे
**व्यवस्थापक**
सौ. अरुणा किरण जाधव
मो. ९९८७५१२००१
**छायाचित्रकार/प्रतिनिधी**
सुदेश सकपाळ
**वितरण प्रतिनिधी**
संतोष मदने
**ऑफिस पत्ता :-**
गाळा नं. ०६, आई जीवदानी कॉम्प्लेक्स, हरिश्चंद्र अपार्टमेंटच्या मागे,वारेकर शाळेजवळ, गुरुदर्शन नगर, मुंब्रादेवी कॉलनी रोड, दिवा (पूर्व), ठाणे-४००६१२.

## ठाण्यात पार्क केलेल्या टेम्पो आग

**ठाणे:** मानपाडा खेवरा सर्कल येथे पार्क केलेल्या एका चारचाकी टेम्पोने अचानक मंगळवारी दुपारी पावणे एकच्या सुमारास पेट घेतले. ही आग शॉर्ट सर्किट झाल्याने लागल्याचा प्राथमिक अंदाज वर्तविण्यात आला असून या आगीची माहिती मिळताच घटनास्थळी अग्निशमन दलाच्या जवानांनी धाव घेत, तिच्या नियंत्रण मिळविले. तसेच या आगीत कोणालाही दुखापत झाली नसल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन कक्षाने दिली.



## ठाण्यात घराची भिंत कोसळली

## सुदैवाने कोणालाही दुखापत नाही



**ठाणे:** वागळे इस्टेट, रोड नंबर २८,येथे कब्रस्तान जवळ संतोषी माता चाळीमधील घराची भिंत कोसळल्याची घटना बुधवारी दुपारी दोन सुमारास घडली. सुदैवाने या घटनेत कोणालाही दुखापत झाली नसली तरी भिंत पडलेल्या घराच्या बाजूचे घरे धोकादायक झाले आहे. अशी माहिती आपत्ती व्यवस्थापन कक्षाने दिली.

वागळे इस्टेट येथे जगतनारायन यादव यांच्या मालकीच्या घराची अंदाजे लांबी २० फूट, उंची ९ फूट भिंत पडल्याची माहिती मिळताच घटनास्थळी स्थानिक माजी लोकप्रतिनिधी ,लोकमान्य प्रभाग समितीचे कार्यकारी अभियंता व कनिष्ठ अभियंता , अतिक्रमण विभागाचे कर्मचारी, आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी यांनी धाव घेत, कोणालाहा दुखापत झाली आहे याची पाहणी केली. तसेच आपत्ती व्यवस्थापन कक्षाच्या कर्मचाऱ्यांनी सुरक्षेच्या दृष्टीने धोकापट्टी लावून बॅरिकेटिंग केले आहे.

तसेच भिंत पडलेल्या घराच्या उर्वरित ३० फूट भिंतीचा भाग धोकादायक झाला आहे.तर भिंत पडल्यामुळे बाजूला असलेले संजय जंगेसी यांच्या मालकीचे घर देखील धोकादायक झाले आहे. अशी माहिती आपत्ती व्यवस्थापन कक्षाने दिली.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक सुहास शांताराम खंडागळे यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया आणि पब्लीकेशन प्रा. लि. प्लॉट क्र. डब्ल्यू २३०, टीटीसी खैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून, श्रीकृपा बिल्डींग, ए-विंग, पहिला माळा, फ्लॅट क्रमांक १०१, सेंट मेरी शाळेजवळ, दिवा (पूर्व), ठाणे-६१२ ता/जि-ठाणे राज्य-महाराष्ट्र येथून प्रकाशित केले. संपर्क-८०८०९७७९५५
**संपादक-सुहास शांताराम खंडागळे RNI No.-MAHMAR/2021/80669**

Printed, Published and Owned by Suhas Shantaram Khandagale and Printed at Siddhhakala Print Media & Publication Pvt. Ltd. Plot No. W--230, TTC Industrial Area, Khairane, Navi Mumbai-400710. Dist. Thane, Maharashtra and Published at Shri Krupa Building, A-Wing, First Flr., Flat No. 101, Near Sent Marry School, Diva (E), Thane-400612 Taluka/Dist. Thane, State-Maharashtra. **Editor : Suhas Shantaram Khandagale, RNI No.-MAHMAR/2021/80669**

दिशादर्शक, मार्गदर्शक!
दिवा न्यूज
ताज्या घडामोडी वाचण्यासाठी लॉग इन करा
www.diwanews.com
सोमवार, १९ डिसेंबर २०२२


# भाजप आणि हिंदुत्ववादी संघटनांचा 'दिवा बंद' यशस्वी



## सुषमा अंधारे यांच्या हिंदू विरुद्ध वक्तव्या विरोधात भाजपने पुकारलेला दिवा बंद यशस्वी झाला



**दिवा:**–महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे आणि याच संतांच्या विरोधात उद्धव ठाकरे गटाच्या प्रवक्त्या सुषमा अंधारे यांनी हिंदू संतांच्या विरुद्ध केलेल्या वक्तव्याचा निषेध म्हणून वारकरी संप्रदायाकडून आज ठाणे बंदची हाक देण्यात आली होती या बंदला ठाणे शहर जिल्हा भाजप कडून पाठिंबा दर्शवण्यात आला होता ठाणे शहर अध्यक्ष आमदार ॲड. निरंजन डावखरे व ठाणे शहर आमदार संजय केलकर यांच्या नेतृत्वात आज दिव्यालाही दिवा भाजपकडून बंद पाळण्यात आला या बदला दिव्यातील जनतेने उत्स्फूर्त असा प्रतिसाद दिला दिवा भाजप व हिंदू संघटना यांच्याकडून सुषमा अंधारे यांच्या प्रतिमात्मक पुतला जाळून निषेध करण्यात आला यावेळी दिवा शहराध्यक्ष रोहिदास मुंडे ठाणे शहर ओबीसी मोर्चा उपाध्यक्ष विनोद भगत सरचिटणीस युवराज यादव दिवा युवा मोर्चा अध्यक्ष सचिन भोईर महिला अध्यक्ष ज्योती पाटील ओबीसी मोर्चा अध्यक्ष रोशन भगत उत्तर भारतीय मोर्चा अध्यक्ष अजय सिंग गुजराती सेल अशोक सोलंकी व्यापारी सेल अध्यक्ष जयदीप भोईर प्रवीण पाटील पंकज सिंग अवधराज राजभर वीरेंद्र गुप्ता दीपक गुप्ता धर्मेंद्र विश्वकर्मा राजा आंब्रे आनंदा पाटील अमन गुप्ता दिनेश गुप्ता आधी कार्यकर्ते उपस्थित होते

## दिव्यात विकास कामांना निधी देणाऱ्या आमदार निरंजन डावखरे यांचे दिवा भाजपने मांनले आभार!



**ठाणे:**–भाजपचे ठाणे जिल्हा अध्यक्ष आमदार निरंजन डावखरे यांनी आपल्या आमदार निधीतून दिवा शहरात विविध सुविधा उपलब्ध करून दिल्या बद्दल भाजप मंडळ अध्यक्ष व महिला मंडळ अध्यक्षा ज्योती पाटील यांनी डावखरे यांचे आभार मानले.

ठाणे येथे प्रत्यक्ष जाऊन दिव्यातील नागरिकांच्या वतीने रोहिदास मुंडे आणि ज्योती पाटील यांनी निरंजन डावखरे यांचे आभार मानले. दिवा शहरात एकही सार्वजनिक सौचालय नसल्याने निरंजन डावखरे यांनी आपल्या आमदार निधीतून ई टॉयलेट दिव्यातील नागरीकांसाठी उपलब्ध करून दिले.याशिवाय शहरात आसन व्यवस्था, निवारा शेडची सुविधा डावखरे यांनी उपलब्ध करून दिली आहे.याशिवाय गणेश घाट आगासन येथे ई टॉयलेट उपलब्ध करून दिल्याबद्दल मुंडे यांनी त्यांचे आभार मानले आहेत.

दलित पँथर संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष रामभाऊ तायडे यांच्या हस्ते दिव्यातील समाज सेवक राहुल शिंदे यांची दलित पँथरच्या दिवा शहर उपाध्यक्ष पदी निवड करण्यात आली. त्या वेळेस महाराष्ट्र प्रदेश कला मंच कार्यकारणी दिपक केदार , महिला उपाध्यक्ष कविता मगरे , ठाणे शहर अध्यक्ष जयेश बनसोडे , ठाणे शहर युवक उपाध्यक्ष विकी गायगोले , दिवा शहर महिला सचिव संजना पलांडे , दिवा शहर महिला संघटक श्वेता खांबे , साबे गाव छावनी अध्यक्ष वैशाली इंगोले व इतर वरिष्ठ पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.






## नवीन वर्षात दिवेकर प्रवाशांना मिळणार सरकत्या जिन्यांचं गिफ्ट

**दिवा:**– खासदार डॉ श्रीकांत शिंदे यांच्या प्रयत्नने दिवा स्थानकात ठिकठिकाणी बसणार सरकते जिने.दिवा पश्चिम आणि दिवा पूर्वेला काम सुरू. फलाट क्रमांक १ व २ वर मुंबई दिशेला आणि फलाट क्रमांक ३ व ४ वर मधल्या जिन्या जवळ होणार नवीन सरकते जिने. दिवा पश्चिमेतील सरकत्या जिन्याच्या कामाची पाहणी करताना दिवा शहराचे मा नगरसेवक श्री.शैलेश मनोहर पाटील,विभागप्रमुख भालचंद्र भगत.

## अर्चना पाटील आयोजित शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**दिवा:** सौ.अर्चना निलेश पाटील यांच्या मार्फत साबे येथे पंतप्रधान पथविक्रेता आत्मनिर्भर निधी शिबीर आयोजित करण्यात आले होते.

या शिबिरात सदर योजनेचा लाभ शेकडो नागरिकांनी घेतला.नागरिकांसाठी लोकहिताचे उपक्रम राबविण्याचे काम निलेश पाटील आणि अर्चना पाटील करत असतात.









# हे सरकार आहे की, विवाह नोंदणी कार्यालय?

## हे सरकार वर्ण–वर्ग व्यवस्था मजबूत करण्यासाठी काम करतेय– डॉ. जितेंद्र आव्हाड

**ठाणे :** आंतरजातीय आणि आंतरधर्मिय विवाह करण्यापूर्वी सरकारला कळवायचे; मग, सरकार मुलीच्या कुटुंबियांशी चर्चा करणार, असे परित्रक काढण्यात आले आहे. या परिपत्रकाची चर्चा करीत असताना सदरचे परिपत्रक हे संविधान विरोधी आणि मूलभूत अधिकारांवर अतिक्रमण करणारे आहे. नशीब अजून सरकार हे सांगत नाही की आम्ही कुंडल्या जमवून बघू आणि मग त्यानंतर होकार किंवा नकार कळवू. हे सरकार आहे कि विवाह नोंदणी कार्यालय? असा सवाल करीत हे सरकार वर्ण–वर्ग व्यवस्था मजबूत करण्यासाठी काम करतेय, अशी टीका राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते ,मा. मंत्र. डॉ. जितेंद्र आव्हाड यांनी केली.

आंतरजातीय किंवा आंतरधर्मिय विवाहांची माहिती आधी सरकारला कळवायची; त्यानंतर सरकारी पॅनल मुलांच्या पालकांशी चर्चा करेल, अशा आशयाचा एक निर्णय महाराष्ट्र सरकारने घेतला आहे. या निर्णयावर डॉ. आव्हाड यांनी जोरदार टीका केली.

डॉ. आव्हाड म्हणाले की, या सरकारला वेड लागले आहे, असे मला वाटते. पुरोगामी महाराष्ट्राचा इतिहास ज्यांना माहित आहे. त्यांना हे माहित असले पाहिजे की, महात्मा फुले यांनी यशवंत नामक ब्राम्हण मुलगा दत्तक घेतला. शाहू महाराजांनी आपल्या घरातील पहिले लग्न एका धनगराच्या घरात केले. बाबासाहेब आंबेडकरांची दुसरी पत्नी या ब्राम्हण होत्या. वर्णव्यवस्थेच्या निषेधार्थ डॉ. बाबासाहेबांनी मनुस्मृती जाळल्यानंतर या महाराष्ट्रात अनेक आंतरजातीय विहावह झाले आहेत. आपले स्वत:चे आंतरजातीय विहाह आहे. पण, आंतराजातीय विवाह करणार असाल तर तुम्हाला ते सरकारला कळवावे लागेल, ही कोणती पद्धत आहे. सरकारला का कळवायचे? आम्ही सज्ञान आहोत ना? जर १८ वे वर्ष आम्हाला सज्ञान घोषीत करणार असाल तर आम्ही तुम्हाला का कळवायचे? या परिपत्रकामध्ये असेही म्हटलेय की सरकार मुलीच्या पालकांशी चर्चा करणार; कदाचित मुलांचे आपल्या मातापित्याशी नसेल पटणार! ही मुले आपल्या पालकांच्या मनाविरुद्ध लग्न करणार असतील; पण, त्याची माहिती घेणारे तुम्ही कोण? बर्याचदा आयुष्यभर मुलीशी तिचे पालक बोलत नाहीत. पण, मुलीचा संसार चांगला चालू असतो ना? संसार नावाची जी गोष्ट आहे ती मोडकळीस आणायची आहे का? आता ब्राम्हणांनी ब्राम्हणांसोबत; क्षत्रियांनी क्षत्रियांसोबत आणि शूद्रांनी शूद्रांसोबत लग्न करायची व्यवस्था करुन वर्णव्यवस्था लादण्याचा प्रयत्न करीत आहात काय? आंतरधर्मिय विवाह होणार असतील; तर, त्या दोघांच्या घरी पोहचून त्यांना धमकावयाचे का, मंगलपरभात लोढा यांना महाराष्ट्राचे संस्कार आणि संस्कृती काय माहित आहे? हा पुरोगामी महाराष्ट्राला प्रतिगामी करण्याचा हा डाव आहे. १९२७ ला बाबासाहेबांनी जाळलेली मनुस्मृती मागच्या दाराने हे सरकार आत आणतंय. हे सरकार वर्ण–वर्ग व्यवस्था मजबूत करण्यासाठी काम करतेय.

लव्ह जिहाद बाबत पत्रकारांनी विचारले असता, ते म्हणाले की, लव्ह जिहाद वगैरे सर्व खोटे आहेत. घटस्फोट कुठे होत नाहीत? एकच समाज असा आहे की तो म्हणजे ख्रिश्चन! तिथे विलगतेला परवानगीच नाही; बायबलमध्ये तसे लिहिलेय. जेव्हा तुम्ही धर्माबद्दल बोलता ना, तेव्हा त्या त्या धर्मग्रंथांचा अभ्यास करा. त्यामध्ये काय करुन ठेवलेय ते पहा. येशूने सांगितलेय असे त्यांचे म्हणणे आहे. ते येशूच्या सूचनांचा अवलंब करतात. आपण दुसर्या धर्मांकडून काही शिकायचे नाही. आपला धर्म श्रेष्ठ आहे, हे सांगण्यासाठी नको ते धंदे सुरु करायचे, असा प्रकार सुरु असल्याचा टोलाही त्यांनी लगावला.

# ठाणे जिल्ह्यात एचआयव्ही बाधितांची संख्या कमी करण्यात यश

ठाणे: ठाणे जिल्ह्यात एचआयव्ही बाधित रुग्णांची संख्या कमी झाल्याने ठाणे जिल्हा एड्स मुक्तिकडे धाव घेताना दिसत आहे. पण,याच जिल्ह्यात अतिजोखमीच्या गटांमुळे एचआयव्ही रुग्णांची संख्या झपाट्याने वाढू शकते, तिला आटोक्यात ठेवण्याचे काम ठाणे जिल्हा एडस् प्रतिबंध व नियंत्रण विभाग अंतर्गत काम करणाऱ्या तब्बल ३२ एनजीओ अक्षरशः झटताना दिसत आहे. त्यांच्या मार्फत सुरू असलेल्या जनजागृतीद्वारे जिल्ह्यात एचआयव्हीला पायबंदी घालण्यात यश आले आहे. या संस्था फक्त त्या त्या गटातील व्यक्तींचा शोध घेत नाही, तर एचआयव्हीला वेळीच कसा रोखला जाऊ शकतो, यासाठी प्रतिबंधात्मक, उपचारात्मक व काळजी/सेवात्मक कार्य करत असतात. यामुळे अतिजोखमी गटातील संख्या हळूहळू नोंदणीतून जरी समोर येताना दिसत आहे. यामध्ये सर्वाधिक तृतीय पंथीची संख्या असली तरी समलिंगीची संख्या ही ठाणे जिल्ह्यात २ हजार ६१५ इतकी असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

ठाणे जिल्हा विठ्ठल सायन्ना सामान्य रुग्णालय आणि जिल्हा एड्स कार्यक्रम नियंत्रण विभाग अंतर्गत कार्यरत असणाऱ्या सेवा सुविधा केंद्रे यांच्या मार्फत या आजारावर नियंत्रण मिळविण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. अतिजोखमींच्या गटासोबत काम करणाऱ्या संस्थांमध्ये देहविक्री करून व्यवसाय करणाऱ्या महिलांसाठी काम करणाऱ्या संस्थांची संख्या ११ आहे. तर समलिंगी घटकासोबत काम करणाऱ्या ०२ संस्था असून शिरे वाटे मादक द्रव्य घेणाऱ्या गटासोबत काम करणारी १ संस्था आहे. याशिवाय तृतीय पंथी गटासोबत काम करणाऱ्या ५ संस्था असून स्थलांतरित कामगार गटासोबत काम करणाऱ्या ११ संस्था आहेत. याचबरोबर ट्रक चालकांसोबत काम करणाऱ्या २ संस्था असून एकूण ३२ संस्था आहे. त्या प्रत्येक संस्थांना वर्षाला अमुक येवढी नोंद करण्याचे टार्गेट दिले जाते. या आजारापासून रोखण्यासाठी यशस्वी प्रयत्न केले आहे.

*अतिजोखमीच्या गटातील एच आय व्ही पॉजीटीव्हीटी जरी कमी झालेली आहे, तरी देखील पूर्णपणे धोका टळलेला नाही. भविष्यात देखील अतिजोखिम असणाऱ्यांनी व त्यांच्या संपर्कात येणाऱ्यांनी योग्य ती काळजी घ्यावी.*

**– डॉ कैलास पवार,**
*जिल्हा शल्य चिकित्सक,*
*जिल्हा सामान्य रुग्णालय ठाणे*

# नागरिकांच्या तक्रारींचे निवारण पूर्ण क्षमतेने करा, चालढकलपणा करु नका

## महापालिका आयुक्त यांच्या अधिकारी कर्मचारी यांना सूचना

**ठाणे :** नागरिकांनी महापालिकेत स्वत: येवून किंवा दूरध्वनीवरुन संपर्क साधून एखाद्या समस्येबाबत तक्रार केली तर त्या नागरिकांचे म्हणणे समजून घ्या, त्यांच्याशी समंजसपणे संवाद साधून त्यांची तक्रार पूर्ण क्षमतेने सोडविण्याचा प्रयत्न करा. विनाकारण नागरिकांना संबंधित विभागात जा, हे काम आमचे नाही अशी उत्तरे देवू नका. समस्यांचे निराकरण करण्याचा दृष्टीकोन डोळ्यासमोर ठेवा अशा सूचना महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांनी मंगळवारी झालेल्या आढावा बैठकीत अधिकारी, कर्मचारी यांना दिल्या.

महापालिकेत नागरिक समस्यांचे निराकरण करुन घेण्यासाठी येत असतात, अशावेळी त्यांना सहकार्य करणे हे प्रत्येक अधिकारी कर्मचाऱ्याचे कर्तव्य आहे. याबाबत एका नागरिकाने आयुक्त अभिजीत बांगर यांना फोन करुन त्यांना आलेला अनुभव सांगितला, याचे उदाहरण आज आयुक्तांनी बैठकीत दिले. त्यामुळे यापुढे अधिकाऱ्यांनी नागरिकांशी सामंजस्यानेच वागलेच पाहिजे अशा सूचना बैठकीत बांगर यांनी दिल्या.

शहरात सुरू असलेली रस्त्यांची कामे पुर्ण करीत असताना सदरची कामे दर्जात्मक असायला हवीत. एकत्र जोडणाऱ्या रस्त्याची पातळी समान असलीच पाहिजे तसेच महत्वाच्या रस्त्यावर साईडपट्ट्या नागरिक व वाहनचालकांना दिसतील अशा ठळक पध्दतीने रंगविण्यात याव्यात असे सांगतानाच महापालिकेतील सर्व अभियंत्यांनी मरगळ झटकून कामे करा असा सूचक इशाराही त्यांनी या बैठकीत दिला.

यावेळी शहर सौंदर्यीकरण कामाचा आढावा आयुक्त बांगर यांनी घेतला. यावेळी संपूर्ण शहरात सौंदर्यीकरणाच्या कामाअंतर्गत सर्वच विभागातील भिंतीवर बोलकी व आकर्षक चित्रे काढण्याचे काम सुरू आहे. ही सर्व कामे ही १५ जानेवारी २०२३ पर्यंत पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

# चंदगडसाठी लालपरीचा महाराष्ट्र-कर्नाटक मार्गे पुन्हा महाराष्ट्र प्रवास सुरू




ठाणे : एकीकडे महाराष्ट्र आणि कर्नाटक यांच्यात संबंध बिघडत असताना, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या ठाणे विभागाने 'चंदगड' या ठिकाणी ये- जा करता यावे यासाठी आपली लालपरीच्या प्रवासाची मुहूर्तमेढ रोवली आहे. हा प्रवास महाराष्ट्र-कर्नाटक मार्गे पुन्हा महाराष्ट्र असाच असणार आहे. ठाणे येथून थेट चंदगडला लालपरीतून अवघ्या ९९० रुपयांमध्ये प्रवास करण्याची व्यवस्था उपलब्ध करून देण्यात आली आहे. यामुळे ठाणे- स्वारगेट-सातारा-कराड--कोल्हापुर-कागल-निपाणी-गडहिंगलज- नेसरी-चंदगड तेथील नागरिकांना प्रवासासाठी दिलासा मिळणार आहे.

कोल्हापूर येथे काही प्रवासी संघटनांनी चंदगड येथे ये- जा करण्यासाठी एसटी (लालपरी) बस उपलब्ध करू द्यावी अशी मागणी लावून धरली होती. त्या मागणीला अनुसरूनच हा मार्ग नियोजित केला आहे. पण,चंदगड हे जरी महाराष्ट्र असले तरी तेथे जाण्यासाठी कर्नाटक मार्ग पुन्हा महाराष्ट्रात यावे लागते. एकीकडे दोन्ही राज्यात सीमावाद पेटला असताना, ठाणे विभागाने एक धाडसी निर्णय घेतला आहे. तसेच ठाणे येथून चंदगड येथे जाण्यासाठी तब्बल १४ तासांहून अधिकचा कालावधी लागतो. म्हणून या मार्गावर प्रवासासाठी विनावातानुकुलीत स्लीपर आसन व्यवस्था उपलब्ध करून दिली असून तेही अवघ्या ९९० रुपयांमध्ये. ही बस ठाणे वंदना बसस्थानकानतुन दुपारी ५ वाजून १५ मिनिटांनी सुटणार असुन चंदगड येथे दुसऱ्या दिवशी सकाळी साडेसहा वाजता पोहचेल. त्याचप्रमाणे चंदगड येथून दुपारी साडेतीन वाजता निघुन ठाणे येथे दुसऱ्या दिवशी सकाळी ५ वाजेपर्यंत येईल असे ठाणे विभागाने म्हटले आहे. लालपरीच्या प्रवासासाठी ऑफलाईन तसेच ऑनलाईन आरक्षण व्यवस्था उपलब्ध आहे. याशिवाय ीीींल ीशीर्शीींशींळेप ोलळश्रश र्ी व्दारे ही आरक्षणाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. त्यामुळे या फेरीचा लाभ प्रवाशांनी घ्यावा असे आवाहनठाणे विभागाने केले आहे.

या बसच्या पहिल्या फेरीचे उदघाटन ठाणे वंदना बसस्थानक येथे ठाणे प्रादेशिक परिवहन विभागाचे उपप्रादेशिक परिवहन अधिकारी जयंत पाटील यांच्या हस्ते मंगळवारी पार पाडले.

| मार्ग | तिकीट दर |
|---|---|
| ठाणे- चंदगड | ९९० |
| ठाणे- नेसरी | ९४५ |
| ठाणे -गडहिंगळज | ८९५ |
| ठाणे-निपाणी | ८४५ |
| ठाणे-कागल | ७९५ |
| ठाणे-कोल्हापूर | ७६० |
| ठाणे-कराड | ६१५ |
| ठाणे-सातारा | ५१० |
| ठाणे-स्वारगेट। | ३१० |
| स्वारगेट-चंदगड। | ६८० |
| स्वारगेट-कोल्हापूर | ४५० |

# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लवकर व्हायला हव्यात -राज ठाकरे

**ठाणे:** महत्वाचे म्हणजे ज्या सोयी-सुविधा देणे हे महापालिका प्रशासनाचे काम असते, ते कामे किंवा सुविधा ही पैसे घेऊन बिल्डर पुरवत असल्याने शहरे ही महापालिका नाहीतर चक्क बिल्डर चालवत आहेत. असाच आरोप मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी बुधवारी ठाण्यात पत्रकारांशी अनौपचारिक गप्पा मारताना केले.

**शहरे महापालिका नाही तर बिल्डर चालवतात - राज ठाकरे**

दरम्यान नागरिकांचे प्रश्न सोडविण्यासाठी लोकप्रतिनिधीची गरज असते. त्यांच्या माध्यमातूनच सभागृहात आवाज उठवला जातो.परिणामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लवकर व्हायला हव्यात. असेही ते म्हणाले. पॅनल पध्दतीने मनसेचा विरोध असून यापूर्वी निवडणूका होत नव्हत्या असा ही सवाल उपस्थित केला.

राज ठाकरे हे ठाण्यातील ब्रह्मांड येथे देवीच्या दर्शनाला आले होते. त्यानंतर त्यांनी शहरातील वाहतूक समस्या ते पॅनल पध्द्तीने होत असलेल्या निवडणुकांबाबत ठाण्यातील पत्रकारांशी चर्चा केली. यावेळी मुळात पॅनल पध्द्तीने निवडणुका ही काही राजकीय पक्षांची सोय आहे .राष्ट्रवादी कॉंग्रेस असो किंवा भाजपा यांनी पॅनल पध्द्तीने निवडणूका का घेण्याचे ठरवले हा प्रश्नच आहे. यापूर्वी निवडणुका होत नव्हत्या का असा सवाल त्यांनी उपस्थित केला. तसेच या पॅनल पध्द्तीत एकाच पक्षाच्या निवडून आलेल्या नगरसेवकांमध्येच एकमत नसते. मग नागरिकांच्या समस्या कशा सुटतील असेही ते म्हणाले. तर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या बाबतीत काहीच निश्चित दिसत नाही. त्या कधी होतील याबाबत विविध चर्चा ऐकायला येत असल्याचे ही ते म्हणाले. पण नागरिकांचे प्रश्न सोडवायचे असल्यास लोकप्रतिनिधींची गरज आहे . त्यांच्या माध्यमातूनच समस्या सोडवल्या जातात . ते जर सभागृहात नसतील तर यावर वाचा कोण फोडणार असेही राज ठाकरे म्हणाले. परिणामी महापालिकेच्या निवडणूका या लवकरात लवकर व्हाव्यात असे त्यांनी सांगितले. दरम्यान वाहतूक समस्या सोडवायची असेल तर त्याकरिता ठोस अशी नियमावली हवी. तसेच एका व्यक्तीकडे किती वाहने हवीत, यालाही मर्यादा हवी. मुळात आपल्या येथील नागरिकांना सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेची सवय जडणे गरजेचे आहे . तरच मेट्रो सारखे प्रकल्प यशस्वी होऊ शकतील असेही त्यांनी सांगितले. याशिवाय महत्वाचे म्हणजे ज्या सोयी- सुविधा महापालिका प्रशासनाने देणे गरजेचे आहे .त्या सुविधा बिल्डर रहिवाश्यांकडून पैसे घेऊन पुरवतात.त्यामुळे शहरे ही महापालिका नव्हे तर बिल्डर चालवत असल्याचा आरोप ही त्यांनी केला. तसेच येत्या काही दिवसांत मी ठाण्याचा चार ते पाच दिवसांचा दौरा करणार असल्याचेही राज ठाकरे यांनी सांगितले.

# ठाणे शहरात गोवर रुबेला विशेष लसीकरण मोहिम



## 'गोवर आणि रुबेलाला हरवूया... हे लसीकरण नक्की करुया' असे ठामपाचे आवाहन

**ठाणे :** ठाणे महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य विभागातर्फे ठाणे शहरात डिसेंबर २०२२ व जानेवारी २०२३ या कालावधीत विशेष गोवर रुबेला मोहिम राबविण्यात येणार असून 'गोवर आणि रुबेलाला हरवूया ..हे लसीकरण नक्की करुया' असे आवाहन केले आहे.

या मोहिमेची पहिली फेरी १५ ते २५ डिसेंबर २०२२ आणि दुसरी फेरी १५ ते २५ जानेवारी २०२३ या कालावधीत पार पडणार आहे. या मोहिमेत लसीकरणापासून वंचित राहिलेल्या बालकांचे लसीकरण करुन घ्यावे असे आवाहन महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांनी केले आहे.

गोवर रुबेला लसीचा पहिला डोस ९ ते १२ महिने वयोगटात, तर दुसरा डोस १६ ते २४ महिने वयात घेणे अपेक्षित आहे. ९ महिने ते ५ वर्षाच्या बालकांचा गोवर रुबेला लसीचा पहिला किंवा दुसरा डोस अथवा दोन्ही डोस राहिलेल्या बालकांना वंचित डोस या विशेष मोहिमेमध्ये देण्यात येणार आहे.

तसेच गोवर रुबेला लसीच्या कोणत्याही दोन डोसमधील अंतर हे २८ दिवसाचे राहिल याबाबत दक्षता घ्यावी. गोवर रुबेला लसीकरणापासून एकही बालक वंचित राहू नये यासाठी आरोग्य सेविका, आशा कार्यकर्त्या व अंगणवाडी सेविका यांना घरोघरी जावून सर्वेक्षण करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

महापालिका क्षेत्रामध्ये माहे नोव्हेंबर २०२२ पासून गोवर रुबेला प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्यात येत आहेत. यामध्ये घरोघरी सर्वेक्षण करुन ताप व पुरळ असणाऱ्या रुग्णांना शोधून त्यांना आवश्यक औषधोपचार देण्यात येत आहेत. तसेच शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार माहे नोव्हेंबर पासून एकूण ४७,०४० बालकांचे गोवर रुबेला लसीकरण करण्यात आले आहे.

'गोवर आणि रुबेलाला हरवूया ..हे लसीकरण नक्की करुया' असे आवाहन ठाणे महानगरपालिकेने केले असून महानगरपालिकेच्या सर्व आरोग्यकेंद्रातंर्गत नियमित लसीकरण सत्रे व अतिरिक्त लसीकरण सत्राचे नियोजन करण्यात आले आहे.

# नववर्षाच्या जल्लोषानिमित्त पर्यटन विकास महामंडळ पर्यटकांच्या स्वागतासाठी सज्ज




**रत्नागिरी–** सरत्या वर्षाला निरोप आणि नववर्षाच्या जल्लोषानिमित्त येणाऱ्या पर्यटन हंगामासाठी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळामार्फत (एमटीडीसी) विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत.

स्वच्छ आणि रमणीय समुद्रकिनारे, ऐतिहासिक गड–किल्ले, प्राचीन मंदिरे आणि संस्कृती, हिरवागार निसर्ग, आयुर्वेदिक आणि नैसर्गिक अप्रतिम खाद्यपदार्थांची मेजवानी देण्यासाठी महामंडळ सज्ज झाले आहे. पर्यटनासाठी पूरक वातावरण पाहता पर्यटक कोकणातील समृद्ध निसर्गाकडे धाव घेत आहेत. त्यांच्या सोयीसाठी महामंडळाचे सर्वच पर्यटक निवास, रिसॉर्ट खुली असून, पर्यटकांना उच्च दर्जाची सेवा आणि आरोग्यपूर्ण सुविधा देण्यासाठी सक्रिय झाली आहेत. त्यानुसार योग आणि वेलनेसची शिबिरे घेण्याचे प्रस्तावित असून, स्थानिक सहली, ट्रेक, गडभ्रमंती यांसारखे उपक्रम राबविण्यात येणार आहेत. विविध छंद, पारंपरिक खेळ इत्यादी बाबींना प्राधान्य देण्यात येणार आहे.

स्थानिक कलाकार, पर्यटन उद्योगाशी निगडित व्यावसायिकांना प्रोत्साहन देण्यात येत आहे. पर्यटक निवासांमध्ये छोटेखानी मनोरंजनाचे आणि सांस्कृतिक कार्यक्रम पर्यटकांच्या सेवेत सादर करण्याचाही महामंडळाचा मानस आहे.

पर्यटनविषयक सुविधा, खाद्यपदार्थांची माहिती, आसपासच्या निसर्गाची माहिती, स्थानिक खेळ, परंपरा, सांस्कृतिक कार्यक्रम, वन्यजीव, वृक्षवल्ली तसेच महामंडळामार्फत पर्यटकांसाठी घेण्यात येणारी खबरदारी, सुरक्षिततेच्या उपाययोजना यांचीही माहिती एमटीडीसीने संकेतस्थळ, फेसबुक आणि व्हॉट्स ॲप ग्रुपच्या माध्यमातून देण्याची तयारी केली आहे. महामंडळाच्या पर्यटक निवासांना पर्यटक प्राधान्य देत असून, डिसेंबरमध्ये महामंडळाच्या पर्यटक निवासांचे ९० टक्के आरक्षण झाले आहे. पर्यटकांनी निसर्गाचे आणि कोव्हिडविषयक भान ठेवून पर्यटनाचा, नववर्ष स्वागताचा आनंद घ्यावा, असे आवाहन एमटीडीसीने केले आहे.

# नासा, इस्त्रो भेटीसाठी विद्यार्थी निवड अंतिम टप्प्यात

**रत्नागिरी–** अंतराळाचा अभ्यास करणार्या नासा, इस्रो या संस्थांच्या भेटीसाठी जिल्हा परिषद शिक्षण विभागाकडून राबवण्यात आलेली विद्यार्थी निवड अंतिम टप्प्यात आली आहे. जिल्हास्तरावरील परीक्षेसाठी ९० विद्यार्थी पात्र ठरले असून मंगळवारी (दि. २० डिसेंबर ) ३६ मुले निवडली जाणार आहेत. ही परीक्षा इन कॅमेरा घेण्यात येणार आहे.

मुलाखतीसाठी विज्ञानातील तज्ज्ञ १५ अध्यापकांची नियुक्ती जिल्हा परिषदेने केली आहे. ग्रामीण भागातील हुशार विद्यार्थ्यांमधून संशोधक, शास्त्रज्ञ निर्माण व्हावेत, या उद्देशाने रत्नागिरी जिल्हा परिषदेने नासा, इस्रो भेटीचा उपक्रम राबवला आहे. जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी कीर्तिकुमार पुजार, अतिरिक्त सीईओ परीक्षित यादव, शिक्षणाधिकारी वामन जगदाळे, संदीप कडव, मुरकुटे यांच्यासह अन्य पदाधिकार्यांनी विद्यार्थी निवडीचे नियोजन केले. यामध्ये केंद्रस्तरावर झालेल्या परीक्षेसाठी २३ हजाराहून अधिक विद्यार्थी बसले होते. त्यामधून बीट स्तरासाठी २६०० विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. त्या परीक्षेतून तालुकास्तरासाठी ५६० विद्यार्थी पात्र ठरले. तालुकास्तरावर झालेल्या परीक्षेतून जिल्हास्तरासाठी ९० विद्यार्थी निवडण्यात आले आहेत. त्यामधून अंतिम निवड होणार आहे.

मुलाखत स्वरूपात होणारी निवड परीक्षा मंगळवारी जिल्हा परिषदेत ठेवण्यात आली आहे. ही चाचणी घेण्यासाठी विज्ञान विषयातील १५ तज्ज्ञ अध्यापक नियुक्त केले आहेत. त्यांची पाच टक्के तयारी केली असून ते नासासाठी ९ तर इस्रोसाठी २७ विद्यार्थी निवडतील. यामध्ये विद्यार्थिनींचाही समावेश आहे. एका पथकात २ तज्ज्ञांचा समावेश केला असून पारदर्शकतेसाठी या प्रक्रियेचे व्हिडीओ शूटिंग केले जाणार आहे.

# खंडाळा इंग्लिश मीडियमस्कूलमध्ये फूड फेस्टिवल उत्साहात

**जाकादेवी /वार्ताहर :** रत्नागिरी तालुक्यातील ग्राम विकास मंडळ वाटद मिरवणे संचलित खंडाळा इंग्लिश मिडीयम स्कुल मध्ये फूड फेस्टिव्हलचे आयोजन करण्यात आलेल्या होते. या फुड फेस्टीवलचे उदघाटन श्री पद्माकर सावंत यांच्या हस्ते झाले. यासाठी ५ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांनी विविध चविष्ठ खाद्यपदार्थांचे स्टॉल मांडले होते. पालकांनी या फूड फेस्टीव्हलला भरभरुन प्रतिसाद दिला. तसेच विद्यार्थ्यांनीही या फेस्टिव्हलचा मनमुराद आनंद घेतला. या फेस्टिव्हलला संस्थापक अध्यक्ष श्री विष्णूदत्त निमकर , उएज श्री प्रकाश कारखानीस ,शिक्षण कमिटी सदस्य अवधूत काळे व इतर पदाधिकारी यांनी भेट दिली.शाळेचे मुख्याध्यापक आशिष वासावे व सर्व शिक्षक व कर्मचारी यांनी हे फूड फेस्टिव्हल यशस्वी होण्यासाठी मुलांना मार्गदर्शन केले.

# संगमेश्वरचा अलोक पोमेंडकरचे जिल्हास्तरीय थाळीफेकमध्ये प्रथम

संगमेश्वर –ऐतिहासिक वारसा असलेल्या संगमेश्वर मधील अभ्यूदय शिक्षण प्रसारक मंडळ, संचलित, प्रचितगड माध्यमिक विद्यालय कारभाटले, ता. संगमेश्वरचा अलोक राजेंद्रकुमार पोमेंडकर याने सावर्डे येथे पार पडलेल्या जिल्हास्तरीय शालेय हिवाळी स्पर्धा थाळीफेकमध्ये प्रथम क्रमांक पटकावून उज्ज्वल यश संपादन केले.

कु.अलोक हा विभागीय स्तरावर कराड येथे होणाऱ्या स्पर्धेसाठी आपल्या रत्नागिरी जिल्ह्याचे नेतृत्व करणार आहे, त्याला पुढील वाटचालीस जिल्ह्याभरातून अभिनंदनाचा व शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# कोकणकन्या एक्सप्रेसचा वेग वाढणार



**रत्नागिरी–** कोकण आणि मध्य रेल्वेने कोकणकन्या एक्स्प्रेसचा वेग वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे कोकणात जाणाऱ्या प्रवाशांच्या प्रवास वेळेत ५० ते ६० मिनिटांची बचत होणार आहे. नव्या वर्षात अर्थात २० जानेवारी २०२३ पासून या निर्णयाची अंमलबजावणी करण्यात येणार असून याचवेळी कोकणकन्या एक्स्प्रेस २०१११/२ या नवीन क्रमांकासह धावणार आहे.

कोकण रेल्वेचे विद्युतीकरण पूर्ण झाल्याने या मार्गावरील डिझेलवर धावणाऱ्या प्रवासी रेल्वेगाड्या विद्युत इंजिनासह धावणार आहेत. यामुळे कोकणकन्यासह अनेक गाड्यांचा वेग वाढणार आहे. जानेवारी २०२३ मध्ये लागू होणाऱ्या वेळापत्रकानुसार, ही गाडी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबई येथून रात्री ११.०५ वाजता रवाना होईल. मडगाव येथे ती दुसऱ्या दिवशी सकाळी ९.४६ वाजता पोहोचेल. मडगाववरून कोकणकन्याचा परतीचा प्रवास सायंकाळी ७ वाजता सुरू होईल. सध्याच्या तुलनेत या गाडीच्या प्रवास वेळेत एका तासाची बचत होणार आहे,

# राजापूरच्या विद्यार्थ्यांची गाळमुक्त अभियान जनजागृती फेरी

***रत्नागिरी–*** *'माझे गाव, माझे घर, चला करू गाळमुक्त शहर' अशा विविधांगी घोषणा देत काढलेल्या फेरीद्वारे राजापूरमधील विश्वनाथ विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी गाळमुक्ती अभियानाची जनजागृती केली. विद्यार्थ्यांनी पारंपरिक पद्धतीने केलेले ढोलवादन आणि विद्यार्थ्यांच्या हातामध्ये विविध संदेश देणाऱ्या फलकांनी साऱ्यांचे लक्ष वेधून घेतले.*

*गाळमुक्त अभियानामध्ये लोकसहभाग वाढावा म्हणून काढण्यात आलेल्या विद्यार्थ्यांच्या जनजागृती फेरीचे स्वागत नगरपालिकेचे मुख्याधिकारी प्रशांत भोसले यांनी जवाहर चौकात केले. यावेळी मुख्य लिपीक जितेंद्र जाधव, महेश शिवलकर, सागर खडपे आदी उपस्थित होते.*

*नाम फाउंडेशनच्या पुढाकाराने आणि नगरपालिका, महसूल विभाग यांच्या सहकार्याने लोकसहभागातून अर्जुना आणि कोदवली नद्यांमधील गाळाचा उपसा करण्याचा निर्धार करण्यात आला आहे. नव्या वर्षामध्ये गाळउपशाच्या प्रत्यक्ष कामाला सुरुवात होणार आहे. गाळउपशाच्या उपक्रमासाठी नाम फाउंडेशनकडून यंत्रसामग्री उपलब्ध करून देण्यात येणार असून, त्यासाठी लागणाऱ्या इंधनाच्या खर्चाचा भार लोकसहभागातून उचलावयाचा आहे. नद्या गाळमुक्त करण्याच्या या अभियानामध्ये उत्स्फूर्तपणे सहभागी होण्याचा निर्धार नुकत्याच झालेल्या बैठकीमध्ये करण्यात आला. त्यानुसार विद्यार्थ्यांनी 'नदीचे करू संरक्षण, राजापूरचे होईल संरक्षण', 'नदीचा श्वास मोकळा करूया, पर्यावरणाचे संवर्धन करूया' अशा घोषणा देत अभियानामध्ये सहभागी होण्याचे आवाहन केले.*

# शहरात १०३ कोटींची 'रंगरंगोटी' ठामपा शाळांत शिक्षणाचा 'बेरंग'

## पडले शाळेत पूर्णवेळ शिक्षकच नाही

**ठाणे:** शहर रंगविण्यासाठी ठाणे महापालिका एकीकडे कोट्यवधी रुपये खर्च करत असताना दुसरीकडे मात्र महापालिकेच्या पडले येथील शाळेत शिक्षकांअभावी विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा बेरंग झाला असल्याची बाब उघडकीस आली आहे. ठाणे शहराचे आमदार संजय केळकर यांनी याबाबत संताप व्यक्त करत तत्काळ पूर्णवेळ शिक्षक नेमण्याची सूचना प्रशासनाला केली आहे.

### आमदार संजय केळकर यांची प्रशासनाकडे नाराजी



### एकाच शिक्षिकेच्या खांद्यावर १०५ विद्यार्थ्यांची जबादारी

एकेकाळी ठाणे महापालिकेच्या शाळांमधून सुमारे ६० हजारहून जास्त विद्यार्थी शिक्षण घेत होते, तर सहा हजारांहून जास्त शिक्षक ज्ञानदानाचे कार्य करत होते, मात्र एकीकडे भ्रष्टाचाराचे प्रमाण महापालिकेत वाढत असताना दुसरीकडे मात्र या शाळांकडे आणि या शाळांमधील हजारो गरीब विद्यार्थ्यांच्या सुविधांकडे पालिका प्रशासनाने दुर्लक्ष झाल्याने गेल्या काही वर्षांत येथील शैक्षणिक दर्जा घसरलाच शिवाय विद्यार्थ्यांची संख्याही घसरू लागली आहे. शाळांच्या दयनीय अवस्थेचे जिवंत उदाहरण ठामपाच्या दिवा-शीळ हद्दीतील पडले गावातील शाळा क्र.९० मध्ये आढळून आले आहे. आमदार केळकर यांच्या मार्गदर्शनाखाली या भागात आधार कार्ड शिबीर आयोजित केले होते. त्यावेळी ही बाब उघडकीस आली.

या शाळेत इयत्ता पहिली ते चौथीचे १०५ विद्यार्थी शिकत असून गेल्या तीन महिन्यात येथे एकही पूर्णवेळ शिक्षक नाही. केवळ एकच शिक्षक येथे कार्यरत असून या सर्व विद्यार्थ्यांची जबाबदारी पेलताना त्यांना तारेवरची कसरत करावी लागत आहे.

याबाबत आमदार केळकर यांनी येथील एकमेव शिक्षकांशी बोलून अडचणी जाणून घेतल्या तसेच विद्यार्थ्यांशीही संवाद साधला. शिक्षक नसल्याने या विद्यार्थ्यांचे भवितव्य अंधारात गेले असल्याची भावना येथील नागरिकांनीही बोलून दाखवली. केळकर यांनी याबाबत संताप व्यक्त करून महापालिकेच्या शिक्षण विभागाच्या उपायुक्त अनघा कदम यांच्याशी संपर्क साधला आणि तत्काळ या शाळेत आवश्यक शिक्षक वर्ग नियुक्त करण्याची तसेच सोयी - सुविधा पुरवण्याची सूचना केली.

शहरात रंगरंगोटीसाठी १०३ कोटींचा खर्च करण्यात येत आहे, याचा आनंदच आहे, पण शाळांकडे दुर्लक्ष करून विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा बेरंग करू नका, अशी अपेक्षा आमदार केळकर यांनी व्यक्त केली.

# कल्याणमधील महारोजगार मेळाव्यात ५ हजार उमेदवारांनी केली नाव नोंदणी


**कल्याण :** कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता विभागाअंतर्गत असलेल्या ठाणे जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र यांच्यातर्फे आयोजित करण्यात आलेल्या पंडीत दीनदयाळ उपाध्याय महारोजगार मेळाव्यात ५ हजार उमेदवारांनी नोकरीसाठी नाव नोंदणी केली. मेळाव्यामध्ये क्वेस कॉर्पो रेशन लिमिटेड, एएससीआयआय प्रा. लि., स्टेल्थ हेल्थ मॅनेजमेंट, रिलायबल लॅब्स, घार्डा केमिकल्स, हॉकीन्स कुकर्स, पीएसएन सप्लाय चेन सोल्युशन्स, आदिश कन्सलटन्सी, इंडो अमाईन्स, रिलायबल एचयूबी इंजिनिअरीग (इंडिया), पितांबरी प्रॉडक्ट्स, भारत गिअर्स, सुयश ग्लोबल, सँड्स् सिनर्जी, पुरोहीत टेक्सटाईल अँड प्रॉडक्ट्स, प्रोमोज इंजिनिअरींग, जेड रबर प्रॉडक्ट, कल्पवृक्ष, कनेक्ट वेल इंडस्ट्रीज, बीईडब्ल्यू इंजिनिअरींग, मार्करीच प्रल, नेक्सजी प्रल एलएलपी आदी विविध नामांकित कंपन्या सहभागी होणार आहेत. नववी, दहावी, ग्रॅज्यूएट, पोस्ट ग्रॅज्यूएट, आयटीआय, इंजिरिअरिंग इत्यादी शैक्षणिक पात्रता असणाऱ्या उमेदवारांसाठी बँक ऑफीस जॉब, एचआर डमिन, एज्युकेशन कौन्सेलर, हाऊसकेअर नर्स, आयटी जॉब्स, बँक ऑफीसर, सेल्स ऑफीसर, सेल्स एक्झिक्यूटिव्ह, टेली कॉलर, स्टोअर इन्चार्ज, कस्टमर सर्व्हिस, फोन बँकिंग, ब्रांच बँकींग, फॅसिलिटी अटेंडंट हाउसकिंपिंग, वॉर्ड बॉय, पॅन्ट्री बॉय, डाटा सायंटिस्ट, सॉफ्टवेअर डेव्हलपर, कारपेंटर, वेल्डर, सिक्युरिटी गार्ड, ऑफिस बॉय, इलेक्ट्रीशियन, ड्रायव्हर, प्लंबर अशा विविध प्रकारची एकुण १३ हजार १०९ रिक्तपदे उपलब्ध, होती .

मेळाव्यामध्ये स्वयंरोजगार इच्छुक उमेदवारांकरिता स्वयंरोजगारासाठी आर्थिक सहाय्य उपलब्ध करुन देणारी विविध शासकीय महामंडळे सहभागी होणार असून यामध्ये अण्णाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ, मौलाना आजाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ इत्यादी महामंडळांच्या विविध योजनांची माहिती देणारे स्टॉल लावण्यात येणार असून याव्दारे विविध योजनांची माहिती व मार्गदर्शन करण्यात येणार आहे. याचबरोबर विविध शासकीय व खाजगी क्षेत्रातील बँकांचाही समावेश होता.महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटीमार्फत राज्यात राबविण्यात येत असलेल्या प्रशिक्षण योजनांची माहितीही देण्यात आली .


# ... अखेर लोकमान्यनगरचा ठाकुर तरण तलाव खुला



***ठाणे:** लोकमान्यनगर येथील स्व. रामचंद्र ठाकुर तरण तलाव कोरोनाच्या संकटामुळे गेली दोन वर्षांपासून जनतेसाठी बंद करण्यात आला होता. कोरोनाच्या संकटकाळात शासनाच्या निर्देशानुसार सर्व तरण तलाव जनतेसाठी बंद ठेवण्यात आले होते त्यामध्ये ह्या तरण तलावाचा सुध्दा समावेश होता. तसेच महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी तरण तलाव बांधत असताना योग्य त्या तज्ञाकडून तरण तलावाच्या बांधकामाला मार्गदर्शन न घेतल्यामुळे त्यामधील फिल्टरेशन प्लांट चुकीच्या पध्दतीने बसविण्यात आला होता. त्यामुळे तरण तलावाचे पाणी फिल्टरेशन प्लांटमध्ये जाऊन वारंवार फिल्टरेशन प्लांट बंद पडत होता. त्यामुळे तरण तलाव पोहण्यायोग्य नसल्यामुळे महानगरपालिकेकडून पुर्णपणे बंद ठेवण्यात आला होता.*



*कोरोनामुळे महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती बेताचीच असल्याने फिल्टरेशन प्लांटचा खर्च महानगरपालिका करीत नव्हती. परंतू, आमदार प्रताप सरनाईक यांनी तात्कालिन आयुक्त शर्मा व आताचे आयुक्त बांगर, क्रीडा अधिकारी मिनल पालांडे यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा करून हा फिल्टरेशन प्लांट दुरुस्त करून घेतला. त्यामुळे आता हा तरण तलाव सर्वसामान्य नागरिकांना आजपासून खुला करण्याचे महानगरपालिकेने निश्चित केलेले आहे. तसेच या भागातील माजी नगरसेवक पुर्वे श सरनाईक व माजी नगरसेविका आशा डोंगरे यांनी विद्यार्थ्यांसाठी ख्रिसमस व नविन वर्षाच्या सुट्यांदरम्यान जलतरण स्पर्धेचेही आयोजन केलेले आहे. त्यामुळे लोकमान्यनगर, शास्त्रीनगर, समतानगर, विजयनगर या परिसरातील शालेय विद्यार्थ्यांना सुध्दा या तरण तलावाचा मोठ्या प्रमाणावर फायदा होणार आहे. हा तरण तलाव यशस्वी पाठपुरावा करून सर्व सामान्य जनतेसाठी खुला केल्याबद्दल आमदार प्रताप सरनाईक यांचे उपस्थित नागरिकांनी आभार मानले. या प्रसंगी माजी नगरसेविका परिषा सरनाईक, माजी नगरसेवक पुर्वेश सरनाईक, माजी नगरसेविका आशा डोंगरे, उपायुक्त दिनेश तायडे, सहायक आयुक्त अक्षय गुडघे, क्रीडा अधिकारी मिनल पालांडे, कार्यकारी अभियंता महेश बहिरम, तरण तलावाच्या व्यवस्थापक रीमा देवरूखकर, उपव्यवस्थापक रवी काळे, उपअभियंता चारूदत्त सरूडकर आदी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.*



# छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयातील कंत्राटदारावर कारवाईचा बडगा



**ठाणे :** ठाणे महापालिकेच्या कळवा येथील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयाच्या पाहणीदौऱ्यादरम्यान रुग्णालयातील अस्वच्छतेबाबत तीव्र नाराजी व्यक्त करीत सफाईचे कंत्राट घेतलेल्या कंत्राटदारावर कारवाई करण्याचे आदेश महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांनी विभागाला दिले आहे. तसेच रुग्णालयाच्या सफाईसाठी १८० कर्मचारी अपेक्षित असताना हजेरीपटावर १०८ कर्मचारीच आढळून आल्याने कमालीचा संताप व्यक्त करीत रुग्णालयाचा सर्व परिसर हा स्वच्छ राहिलाच पाहिजे, याबाबत कुठलीही सबब यापुढे ऐकून घेतली जाणार नसल्याचा चक्क दम वजा इशारा आयुक्तांनी दिला आहे. तसेच रुग्णांना सौजन्याची वागणूक देण्याबाबत काळजी घ्या असा सल्लाही त्यांनी यावेळी दिला. पाहणी दौऱ्यादरम्यान छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. योगेश शर्मा, वैद्यकीय डॉ. अनिरुद्ध माळगांवकर आदी उपस्थित होते.

यावेळी रुग्णालयाच्या तळमजल्यावरील सर्व प्रकारच्या तपासणीचे बाह्यरुग्ण विभाग, क्ष- किरण विभाग, सोनोग्राफी विभाग, एमआरआय कक्षाची पाहणी, लेबर वॉर्ड, एनआयसीयू, औषधी कक्ष, अतिदक्षता विभागांची पाहणी आयुक्त बांगर यांनी केली. सकाळी ९.३० ते दुपारी २.३० या वेळेत केसपेपरसाठी रुग्णांची गर्दी होत असल्याने रुग्णांना विलंब होणार नाही व वेळेत उपचार होतील यासाठी केसपेपर व औषधांसाठी अतिरिक्त खिडक्या वाढविणे तसेच ज्येष्ठ नागरिक व दिव्यांग यांच्यासाठी स्वतंत्र असलेल्या खिडकीवर गरोदर मातांचाही




समावेश करण्याच्या सूचना दिल्या. तसेच तपासणीनंतर रुग्णांना देण्यात येणारे औषध घेण्यासाठी रुग्णांची फार मोठी रांग असल्याचे निदर्शनास येताच बांगर यांनी रुग्णांशी संवाद साधला. औषधे घेण्यासाठी रुग्णांची गैरसोय होवू नये यासाठी अतिरिक्त औषध खिडक्या वाढविण्यात याव्यात व यासाठी लागणारा अतिरिक्त वैद्यकीय कर्मचारी वर्ग घेण्याच्या सूचना त्यांनी विभागाला दिल्या. या पाहणीदौऱ्यादरम्यान दिलेल्या सूचनांची अंमलबजावणी तातडीने होण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्याचे आदेश विभागाला दिले आहे. बालरोगतज्ज्ञ विभाग, अतिदक्षता विभाग, नवजात शिशु अतिदक्षता विभागाची पाहणी आयुक्तांनी केली. रुग्णालयातील नवजात शिशु अतिदक्षता विभागात सद्यस्थितीत २० बेड कार्यरत असून अतिरिक्त १० बेड कार्यरत करण्याच्या सूचना दिल्या.

गोवर वॉर्डचा आढावा घेताना किती रुग्ण दाखल आहेत, आयसीयूमध्ये रुग्ण दाखल आहेत का, दररोज किती रुग्ण दाखल होतात याची माहिती घेतली. त्याचबरोबर पार्किंग प्लाझा येथे किती रुग्ण दाखल आहेत याचाही आढावा घेतला. गोवरच्या बालकांची बालरोग तज्ज्ञांमार्फत तपासणी करण्याच्या सूचना बांगर यांनी दिल्या.

महात्मा फुले जनआरोग्य योजनेतंर्गत दारिद्र्यरेषेखालील रुग्णांचे मोफत उपचार केले जातात. या ठिकाणी असलेल्या कर्मचाऱ्यांची चर्चा केली असता सोनोग्राफी मशीनचे कारट्रेज संपल्याचे निदर्शनास येताच तातडीने मशीनसाठी कारट्रेज खरेदी करा व रुग्णालयातील तातडीच्या खरेदीसाठी १ लाख रुपयांची रक्कम वैद्यकीय अधीक्षक यांच्या स्तरावर देण्याबाबत सांगितले. कोणत्याही कारणास्तव रुग्णांना उपचारासाठी बाहेर जावे लागणार नाही याची दक्षता घेण्याच्या सूचनाही दिल्या.

दिव्यांग व्यक्तींनी दिव्यांग प्रमाणपत्र मिळवण्यासाठी गैरसुविधांचा सामना करावा लागतो, तसेच अनेकदा त्यास विलंबही होतो. दिव्यांग प्रमाणपत्र देण्याची सुविधा सध्या रुग्णालयात तीन दिवस तपासणी सुरू असते. दिव्यांग व्यक्तींना सहजपणे दिव्यांग प्रमाणपत्र मिळावे यासाठी सदरची तपासणी सहाही दिवस सुरू ठेवण्याच्या सूचना दिल्या.

# ठाणेकरांनो, सावधान...!

## सार्वजनिक ठिकाणी नियमांची पायमल्ली केल्यास होऊ शकतो ५०० ते १००० रुपये दंड

**ठाणे :** ठाणे शहरातील स्वच्छतेमध्ये अधिक सुधारणा व्हावी यासाठी महापालिकेकडून मोहिम स्वरुपात विशेष प्रयत्न केले जात आहे. मात्र महापालिका आपली जबाबदारी पार पाडण्याचा प्रयत्न करीत असतानाच नागरिकांनी जर त्यात योगदान दिले नाही तर शहर स्वच्छ राखणे कठीण होवू शकते. ठाणे शहरातील नागरिक हे स्वच्छतेबाबत फार मोठ्या प्रमाणावर सजग आहेत, मात्र काही ठराविक नागरिक अजूनही स्वच्छतेविषयी आपल्या जबाबदारीचे पालन करताना दिसून येत नाही. शहर स्वच्छ राखण्यासाठी अशा व्यक्तींवर दंडात्मक कारवाई करण्याचा अप्रिय निर्णय घेणे आवश्यक ठरते.

ठाणे शहरात आजपर्यंत उघड्यावर कचरा टाकणे, उघड्यावर लघुशंका / शौच करणे, थुंकणे, पाळीव प्राण्याद्वारे अस्वच्छता याबाबत दंड लावण्यात आले होते. परंतु शहरात स्वच्छता मोहिम अधिक तीव्र स्वरुपात हाती घेण्यात आली असल्यामुळे दंडाच्या रकमेत सुधारणा करण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला असल्याचे महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांनी नमूद केले. त्यामुळे ठाणेकरांनो सावधान आता सार्वजनिक ठिकाणी नियमांची पायमल्ली केल्यास आपल्या खिश्याला ५०० ते १००० रुपये दंड काढून भरावा लागणार आहे.

संपूर्ण महापालिका नियमित स्वच्छता होत असून ही मोहिम व्यापक स्वरुपात सुरू राहणार आहे. यामध्ये शहरे हागणदारी मुक्त करणे व शहराची साफसफाई, कचरा संकलन वाहतुक व विल्हेवाट शास्त्रोक्त पध्दतीने लावून शहर स्वच्छ ठेवण्याचे काम करण्यात येत आहे. याचे पालन जे व्यक्ती/संस्था यांचेकडून होणार नाही. त्यांचेवर घनकचरा व्यवस्थापन व हाताळणी नियम २०१६ अंतर्गत दंडात्मक कारवाई करण्याची तरतूद आहे. परंतु सदर दंडाची रक्कम कमी असल्यामुळे नागरिकांना दंड लावून देखील त्याबाबत गांभीर्याने घेत नसल्याने दंडाच्या रक्कमेत सुधारणा करण्याचा निर्णय घेण्यात आला असून त्याची अंमलबजावणी सुरू करण्यात आली आहे.

रस्ते/मार्गावर घाण करणे/कचरा फेकणे सध्याची दंडाची रु.१८०, सुधारित दंडाची रक्कम रु.५००, सार्वजनिक ठिकाणी थुंकणे सध्याची दंडाची रु.१५०, सुधारित दंडाची रक्कम रु.५००, उघडयावर लघवी/लघुशंका करणे सध्याची दंडाची रु.२००, सुधारित दंडाची रक्कम रु.१०००, उघडयावर शौच करणे सध्याची दंडाची रु.५००, सुधारित दंडाची रक्कम रु.१००० व सार्वजनिक ठिकाणी पाळीव प्राण्यांद्वारे अस्वच्छता करणे सध्याची दंडाची रु.१८०, सुधारित दंडाची रक्कम रु.१००० असा बदल करणेचा निर्णय घेण्यात आला आहे.



*“नागरिकांनी आपल्या कर्तव्याची जाणीव ठेवून वर्तणूक करणे अपेक्षित असते. स्वच्छतेमध्ये ठाणे शहरात आजपर्यंत जे सकारात्मक काम झाले ते शहरवासीयांच्या सहभागामुळेच होवू शकते. मात्र जे नागरिक आपल्या कृतीमधून या उद्देशाला हरताळ फासण्याचा प्रयत्न करतात त्यांच्या विरुद्ध दंडनीय कारवाई करणे आवश्यक ठरते, त्यामुळे हा निर्णय घेण्यात आला असून नागरिकांकडून सहकार्याची अपेक्षा आहे.*

*– अभिजीत बांगर, महापालिका आयुक्त, ठाणे*